स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# शासकीय विधी महाविद्यालय

"ए" रोड, चर्चगेट, मुंबई -४०० ०२०.

दुरध्वनी क्र. ०२२-२२०४१७०७ Website- www.glcmumbai.com Email id- principal@glcmumbai.com

क्रमांक -शाविम/आस्था/२०२२-२३/ 1646 दिनांक- १२/०८/२०२२

## दरपत्रक सूचना

मा. प्राचार्य, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई यांच्या वतीने **"या महाविद्यालयाचे आयएसओ (ISO २१००१:२०१८ Education Organizations Management System) (EOMS) प्रमाणिकरण करणे"** या कामाकरीता पात्र, अनुभवी व सक्षम कंपन्यांकडून मोहोरबंद लिफाफ्यांमध्ये दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रकधारकांनी सदर यंत्रणेचे वर्णन (तांत्रिक व अतांत्रिक फॉर्म) महाविद्यालय कार्यालयामधून उपलब्ध करुन घ्यावेत. याबाबतच्या अटी व शर्तींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

**अटी व शर्ती**

१. दरपत्रकाचे फॉर्म भरुन शासकीय विधी महाविद्यालय, ए रोड, चर्चगेट, मुंबई- ४०० ०२० येथे महाविद्यालयाच्या ०२ ऱ्या मजल्यावरील कार्यालयामध्ये दि. २५/०८/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावेत. त्यांनतर आलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.

२. मोहोरबंद लिफाफ्यांवर **"या महाविद्यालयाचे आयएसओ (ISO २१००१:२०१८ Education Organizations Management System) प्रमाणिकरण करणे"** असे लिहिणे आवश्यक आहे. यामध्ये भाग-एक तांत्रिक व भाग- दोन अतांत्रिक असे दोन स्वतंत्र मोहोरबंद लिफाफे (दोन लिफाफा पध्दतीने) दरपत्रके सादर करावीत. अन्यथा दरपत्रक ग्राह्य धरण्यात येणार नाही.

३. दरपत्रक फॉर्मवर दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

४. मोहोरबंद लिफाफ्यावर E-mail id तसेच भ्रमणध्वनी / दुरध्वनी क्रमांक स्पष्टपणे नमूद करावा. दरपत्रकाचे मोहोरबंद लिफाफे उघडतेवळी दरपत्रकधारक स्वत: किंवा त्याचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

५. दरपत्रक सोबतच्या विहित फॉर्मसह दरपत्रक फॉर्मचे **रु. १५००/- (ना-परतावा) शुल्क** महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये भरावे व त्याची पावती दरपत्रकासोबत जोडावी.

६. सदरचे काम करणारी कंपनी ही सर्व तांत्रिकदृष्टया परिपुर्ण व सक्षम असावी.

७. पुरवठा आदेश निर्गमित केल्यानंतर संबंधित कामे तात्काळ व स्विकृत दरपत्रकानुसार करणे संबंधित कंपनीस बंधनकारक राहील.

८. संबंधित पुरवठादाराने सदरच्या कामाचे देयक मुद्रांक पावतीसह सादर करावे. देयक प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांत देयक अदा करण्यात येईल. त्याकरीता महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये बँकेच्या खात्याचा तपशिल सादर करणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे सर्व परिपुर्ण माहितीसह देयके सादर करण्याची

जबाबदारी कंपनीची राहील. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

९. या महाविद्यालयाने दरपत्रक स्विकृत केल्यानंतर १५ दिवसांच्या आत रु. ८०००/- चा principal, Government Law College, Mumbai यांच्या नावे काढलेला डी. डी. सादर करावा.

१०. एका कंपनीस एकच दरपत्रक सादर करता येईल.

११. कोणतेही एक अथवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा, संपुर्ण प्रक्रिया पुर्णपणे किंवा दरपत्रक स्विकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार प्राचार्य व समिती, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई राखून ठेवत आहेत.

१२. प्राप्त दरपत्रकांमधून पात्र कंपनीची निवड संबंधित कामासाठी झाली व त्याने काही कारणास्तव कामाचे कार्यादेश स्विकारण्यास नकार दिला तर त्यापुढील कार्यवाही करण्याचा अधिकार प्राचार्य व समिती, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई राखून ठेवत आहेत.

१३. त्याचप्रमाणे दरपत्रकधारकाशी अनुबंध झाल्यानंतर त्याने आपले काम व्यवस्थितरीत्या न केल्यास सदर दरपत्रकधारकासोबतचा करार तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१४. दरपत्रकाचे फॉर्म शासकीय विधी महाविद्यालय, ए रोड, चर्चगेट, मुंबई च्या दुसऱ्या मजल्यावरील कार्यालयामध्ये दि. २५/०८/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत रु. १५००/- (ना-परतावा) भरल्यानंतर मिळतील.

१५. दरपत्रकधारकाने तांत्रिक निविदेबरोबर काळ्या यादीमध्ये नाव समाविष्ट नसल्याबाबत रु. १०० च्या स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

१६. दरपत्रक सादर करण्यापुर्वी प्रस्तुत कामाबाबतची संपुर्ण माहिती, स्वरुप इ. महाविद्यालयामधून मिळेल.

१७. दरपत्रक धारकाने अनुभवासंबंधीचे कागदपत्रे / प्रमाणपत्रे दरपत्रकासोबत जोडावीत.

१८. या महाविद्यालयाचे आयएसओ (ISO 21001:2018 Education Organizations Management System) प्रमाणिकरण करणे या कामामध्ये Consultation, Documentation Support, Certification इ. बाबींचा समावेश आहे.

A A Vaidya 12/08/22

डॉ. अस्मिता वैद्य

प्राचार्य

शासकीय विधी महाविद्यालय

'अ' मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.

दिनांक- 12/08/2022